**कौशल्य प्रशिक्षण संस्थां (VTP) यांचा कौशल्य विकास धोरणामध्ये सहभाग व योगदान वाढविण्यासाठी राज्य स्तरीय समन्वय समिती गठीत करणेबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०१७/प्र.क्र.९७/अभियान-१**
२ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१७

वाचा: १) शासन निर्णय, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, क्रमांक कौविउ-२०१५/ प्र.क्र.१२२/रोस्वरो-१, दिनांक ०२/०९/२०१५

**प्रस्तावना :**

राज्यातील युवक-युवतींचे कौशल्य विकासाद्वारे सक्षमीकरण करुन त्यांना अधिक मागणी असलेल्या उद्योग, सेवा व तत्सम क्षेत्रात रोजगार/स्वंयरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान राबविण्यास या विभागाच्या दिनांक ०२/०९/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यांत आली आहे. या अभियानांतर्गत खाजगी कौशल्य प्रशिक्षण संस्थांमार्फत (VTP) कौशल्य विकास कार्यक्रम राबविण्यात येत असून, शासनाच्या कौशल्य विकास धोरणांमध्ये त्यांचा सहभाग व योगदान वाढविण्यासाठी तसेच त्यांना प्रशिक्षण कार्यक्रम राबविताना येणाऱ्या समस्या समजून घेण्यासाठी समन्वय समिती गठीत करण्याचा प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २३/०५/२०१७ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला होता. या अनुषंगाने शासन, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी व कौशल्य विकास संस्थां (VTP) यांच्या प्रतिनिधींची समन्वय समिती गठीत करण्याचे शासनाचे विचाराधीन होते.

**शासन निर्णय :**

प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियानांतर्गत राबविण्यात येणाऱ्या कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांसंदर्भातील कौशल्य प्रशिक्षण संस्थांना (VTP) यांना येणाऱ्या समस्या समजून घेणे व शासनाच्या कौशल्य विकास धोरणामध्ये त्यांचा सहभाग व योगदान वाढविण्याच्या दृष्टीने या शासन निर्णयान्वये खालील सदस्यांची समन्वय समिती गठीत करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी | : | अध्यक्ष |
| २. कौशल्य विकास व उद्योजकता विभागातील सह सचिव/उप सचिव दर्जाचा अधिकारी | : | सदस्य |
| ३. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी | : | सदस्य |
| ४. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी | : | सदस्य |
| ५. कौशल्य विकास अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई (किमान दोन) | : | सदस्य |
| ६. राज्यातील प्रत्येक महसूली विभागातील व्हीटीपींचा प्रत्येकी एक प्रतिनिधी | : | सदस्य |
| ७. अभियान समन्वयक, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, मुंबई | : | सदस्य सचिव |

राज्यातील प्रत्येक महसुली विभागातील व्हीटींपीचा प्रतिनिधीची समितीवर सदस्य म्हणून ६ महिन्याच्या कालावधीसाठी नियुक्ती/पुर्न:नियुक्ती करण्याचे अधिकार समिती अध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी यांना रहातील.

**या समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे राहील** :-

१. कौशल्य प्रशिक्षण संस्था व शासन यांमध्ये समन्वय साधणे.
२. कौशल्य प्रशिक्षण संस्थांना (VTP) यांना प्रशिक्षण कार्यक्रम राबविताना येणा-या समस्या समजून घेणे व सदर समस्यांचे निकारण करण्याच्या दृटीने शासनास शिफारस करणे.
३. शासनाचे कौशल्य विकाससबंधीचे धोरण व त्यामध्ये वेळावेळी होणारी सुधारणा यांची माहिती कौशल्य प्रशिक्षण संस्थापर्यंत पोहचविण्यासाठी समन्वयाचे काम करणे.
४. कौशल्य प्रशिक्षण संस्था (VTP) यांचा शासनाच्या कौशल्य विकास धोरणांमध्ये सहभाग/योगदान वाढविण्यासाठी शासनास उपाययोजना सूचविणे. तसेच शासनाने या संदर्भात घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणी बाबत समन्वय राखणे.

प्रस्तूत समितीची बैठक दर दोन महिन्याने महिन्याच्या शेवटच्या सोमवारी (सोमवारी शासकीय सुट्टी असल्यास बुधवारी) आयोजित करण्यात येईल.

सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२०१५४१४३०६०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Wasudev Gawande

Digitally signed by Gajanan Wasudev Gawande
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Skill Development And Entrepreneurship Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=598b4111a7392ee0c9038cf4c426c1f9ef65d75e9ac67ec77c38a9c5895cc932, serialNumber=92cce2bddffe9d1b98d5b31109f5f81e224273580cfca2f478d921078212cf69, cn=Gajanan Wasudev Gawande
Date: 2017.09.20 15:32:10 +05'30'

**( गजानन गावंडे )**

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१. मा. मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
२. मा. राज्यमंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
३. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधानभवन, मुंबई,
४. सर्व विधानमंडळ सदस्य,महाराष्ट्र राज्य,
५. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय , मुंबई,
६. सर्व मंत्रालयीन विभागांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई,
७. आयुक्त, कौशल्य विकास व उद्योजकता संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई,
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटी, कफ परेड, मुंबई,
९. सर्व जिल्हाधिकारी,
१०. संचालक (प्रशिक्षण/व्यवसाय शिक्षण), व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. उपसंचालक, विभागीय मुख्यालय कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, मुंबई/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद /नाशिक,
१२. सर्व जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी.
१३. सर्व सहाय्यक संचालक, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता
१४. सर्व कार्यासने, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई,
१५. निवड नस्ती.

********